लोकमत

# रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा

## गिरीश बापट : मुकुलमाधव फाउंडेशनच्या उपक्रमाचे लोकार्पण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** वैद्यकीय उपचार महागडे होत चालले आहेत. त्यामुळेच अनेक गरीब कुटुंबे उपचार घ्यायची टाळाटाळ करतात. अशा वेळी धर्मादाय म्हणून आरोग्यसेवेसाठी असलेल्या सुविधा पुरवणे व त्या सवलतीच्या दरात गरीब रुग्णांना उपलब्ध करून देणे हीच खरी ईश्वरसेवा आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गिरीश बापट यांनी केले.



येरवड्यातील पालिका रुग्णालयात नवजात बालकांसाठी अत्यावश्यक उपकरणे बसविण्यात आली. त्याच्या उद्घाटन प्रसंगी गिरीश बापट, मुक्ता टिळक, रितू छाब्रिया, प्रकाश छाब्रिया, सिद्धार्थ धेंडे, सौरभ राव, कुणाल कुमार व आदी.

नवजात बालकांसाठी ७४ लाख रुपये खर्च करून व्हेंटिलेटरसारखी अत्यावश्यक उपकरणे येरवड्यातील पालिका रुग्णालयात बसविली आहेत. या वेळी महापौर मुक्ता टिळक, उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, स्थायी समितीचे अध्यक्ष योगेश मुळीक, सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, आमदार जगदीश मुळीक, शिवसेनेचे गटनेते संजय भोसले, नगरसेवक अविनाश बागवे, मनीषा लडकत, अर्चना पाटील, अश्विनी लांडगे, आयुक्त सौरभ राव, माजी आयुक्त कुणाल कुमार, आरोग्य अधिकारी डॉ. अंजली साबणे, मुकुलमाधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया व फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश छाब्रिया तसेच महापालिकेच्या वैद्यकीय विभागातील वरिष्ठ डॉक्टर यावेळी उपस्थित होते.

खासगी रुग्णालयांमध्ये यासाठी महागडे दर आकारण्यात येतात. अनेक कुटुंबांना हा खर्च परवडत नाही. मुकुलमाधव फाउंडेशनच्या पुढाकारामुळे महापालिकेच्या रुग्णालयांमधून आता हे आवश्यक उपचार सवलतीमध्ये केले जातील. दोन्ही विभाग विकसित करण्यासाठी ९८ लाख रुपयांचा खर्च केला आहे. दोन्ही रुग्णालयांमध्ये मिळून एकूण २४ बेड यासाठी ठेवले. केईएम रुग्णालयासाठी जमीन दान करणाऱ्या यशवंत मुदलीयार व दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाचे अध्यक्ष अशोक गोडसे यांचा या कार्यक्रमात सामाजिक कार्यासाठी म्हणून गौरव करण्यात आला. मनीषा लडकत यांनी सूत्रसंचालन केले.

**पत्राद्वारे निसर्गोपचार**

शासनमान्य निसर्गोपचार पध्दतीचा घरबसल्या अभ्यास करुन स्वत:चे नेचरोपॅथी सेंटर सुरु करा. ६ महिन्याचा निसर्गोचार पोस्टल प्रमाणपत्र कोर्स. माहिती पत्रकासाठी पत्ता SMS करा.

मो.9623292062